**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बाहयस्थ संस्थेमार्फत उपलब्ध करुन घ्यावयाच्या मनुष्यबळाबाबत.**

## नियोजन (रोहयो) विभाग

**शासन निर्णय क्रमांक: मग्रारो-२०२४/प्र.क्र.१००/रोहयो-७**
**१६ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालय,**
**मुंबई- ४०००३२**
**दिनांक: २७.०९.२०२४**

**वाचा :-**

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा - 2005,

२) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम (सुधारित) कायदा - 2014,

३) शासन परिपत्रक क्रमांक: मग्रारोहयो-2010/प्र.क्र.07/रोहयो 10अ- दि.16 डिसेंबर, 2010

४) शासन परिपत्रक क्रमांक: मग्रारो-2010/प्र.क्र.04/रोहयो 3- दि. 05 एप्रिल, 2011

५) शासन परिपत्रक क्रमांक: आस्थाप. -2013/प्र.क्र.04/ रोहयो 3- दि. 11 फेब्रुवारी, 2013

६) शासन निर्णय क्रमांक: आस्थाप-2017 /प्र.क्र.102 /मग्रारो 3 दि. 29 सप्टेंबर, 2017

७) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- राज्य निधी असोसिएशनच्या राज्य नियामक मंडळाच्या (Governing Council) दिनांक 27 ऑगस्ट 2019 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

८) शासन परिपत्रक क्रमांक: मग्रारो-2020/प्र.क्र.30/रोहयो- दि. 11 नोव्हेंबर, 2020.

९) शासन परिपत्रक क्रमांक: मग्रारो-2020/प्र.क्र.05/रोहयो-7 दि. 4 ऑगस्ट, 2021.

१०) शासन परिपत्रक क्रमांक: मग्रारो-2020/प्र.क्र.77/रोहयो-7 दि. 25 ऑगस्ट, 2021.

११) शासन परिपत्रक क्रमांक: मग्रारो-2020/प्र.क्र.78/रोहयो-7 दि. 24 सप्टेंबर, 2021.

१२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- राज्य निधी असोसिएशनच्या कार्यकारी समितीची दिनांक 26 ऑक्टोबर, 2021 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

१३) शासन परिपत्रक क्रमांक: मग्रारो-२०२१/प्र.क्र.९२/रोहयो-७ दि.१६ नोव्हेंबर, २०२१

१४) शासन निर्णय क्रमांक: मग्रारोहयो-२०२३/प्र.क्र.२२१/रोहयो-७ दि.१९ जानेवारी, २०२४

**प्रस्तावना :-**

2. मनरेगाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी क्षेत्रिय पातळीवर पुरेसे मनुष्यबळ आवश्यक आहे. असे मनुष्यबळ कोणतेही कायमस्वरूपी दायित्व निर्माण न करता बाह्य यंत्रणांकडून उपलब्ध करून घेण्याबाबत केंद्र व राज्य शासनाच्या सूचना आहेत. याप्रमाणे उपलब्ध करून घेतलेल्या मनुष्यबळाच्या मानधनावरील खर्च केंद्र

शासनकडील ६% प्रशासकिय खर्च व दिनांक १२ मे, २०१० रोजी मा. मंत्री मंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार मनरेगा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ३ टक्के प्रशासकिय निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

३. वरील बाबी लक्षात घेता यापूर्वी क्षेत्रीय पातळीवर प्राधान्याने डेटा एन्ट्री ऑपरेटर (CDEO), पालक तांत्रिक अधिकारी (तांत्रिक सहाय्यक) (PTO) आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (APO) असे मनुष्यबळ दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ व दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ च्या शासन निर्णया अन्वये संख्या निश्चित करून उपलब्ध करून घेतलेले आहे.

४. राज्याने योजने अंतर्गत असलेले विविध अडथळे दुर करुन दक्षिणेकडील राज्ये ज्या पध्दतीने महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेला विकासाची योजना समजतात. त्याप्रमाणे योजना राबविण्यास सुरुवात केली. त्यामुळे योजने वरील खर्च आर्थिक वर्ष २०१८-१९ मधील रु. १८०० कोटी वरुन आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये रु. ४४०० कोटी वर पोहचला. अशामुळे ज्या ग्राम पंचायती मध्ये कामे होत नव्हती अशा जवळपास २००० ते ३००० ग्राम पंचायती मध्ये नव्याने कामे सुरु करण्यात आली. मागील आर्थिक वर्षामध्ये राज्याने १०० दिवसांपर्यंत व १०० दिवसांवरील असे एकूण रु. ११.६० कोटी इतके मनुष्यदिवस निर्माण केले. तसेच या वर्षी २ लाख विहिरी, ७ लाख शेततळे व १० लक्ष फलोत्पादन, वृक्ष लागवड, बांबू लागवड करण्याबाबत विभागाने मिशन पातळीवर काम सुरु केले आहे. यामुळे अधिका-अधिक लाभार्थी योजनेकडे आकर्षीत होत असून यामुळे ग्रामीण भागातील गरीबांच्या जगण्याचा आधार मजबुत होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे.

५. योजनेअंतर्गत आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यासाठीच्या शासन निर्णयामध्ये स्पष्ट नमूद केले आहे की, प्रत्येक वर्षात निर्माण झालेल्या मनुष्य दिवसाच्या आधारे या संख्या निश्चित करण्यात येत आहे. तसेच कामाच्या आवश्यकते प्रमाणे (मनुष्य दिवस निर्मितीच्या आधारावर) हे मनुष्यबळ उपलब्ध करुन दिल्यास कामाची गती व गुणवत्ता वाढविण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करुन दिल्यास अकुशल मजुरांना मागणीनुसार काम उपलब्ध करुन देणे, मजुरांची मजुरी विहित कालावधीत अदा करणे, योजनेअंतर्गत पारदर्शकता ठेवणे, केंद्र शासनाने नव्याने घालून दिलेल्या एन.एम.एम.एस. (NMMS) प्रणालीचा वापर करणे इत्यादि नवनवीन तांत्रिक बाबीचे पालन करण्यासाठी हे मनुष्यबळ उपयोगी पडणार आहे.

६. त्याचप्रमाणे योजनेतील वैयक्तीक लाभाची अधिकाधिक कामे हाती घेणे तसेच अपुर्ण कामे पुर्ण करणे यासारख्या बाबीकडे देखील पुरेसे लक्ष देण्यासाठी नव्याने उपलब्ध करुन दयावयाचे मनुष्यबळ उपयोगी पडणार आहे. मजुरांना अकुशल रोजगार पुरविण्यासोबतच योजनेअंतर्गत टिकाऊ सामुहिक व वैयक्तिक मत्ता देखील निर्माण होणार आहे.

७. एकुणच योजने अंतर्गत निर्माण करण्यात आलेली जागरुकता लक्षात घेता, गरजू मजुर मोठया प्रमाणात कामाची मागणी करतांना दिसत आहेत. असे करतानाच काम मागणी करणा-या कुटूंब संख्येत देखील लक्षणीय वाढ झालेली आहे. साहजिकच कामे कार्यान्वयीत करण्यासाठी मजुरांची मागणी, कामाचे निर्देश पत्र, हजेरी पत्रक निर्गमित करणे, हजेरी पत्रक भरणे, हजेरी पत्रक विहित कालावधीत अदा करणे यासह योजनेची पारदर्शकता अबाधित ठेवणे अनिवार्य आहे. त्याच प्रमाणे ग्राम पंचायत यंत्रणे व्यतिरिक्त सामाजीक वनिकरण, वन विभाग, रेशीम उद्योग, कृषि विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर यंत्रणा देखील कार्यरत आहेत. या सर्व यंत्रणांना स्वतंत्र अथवा समुहाने मनुष्यबळ एकत्रितपणे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

८. जिल्ह्यांना पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून दिल्यास अधिकाधिक स्थावर मालमत्ता निर्माण करता येईल व निर्माण झालेल्या अशा मालमत्तेमधून गरिबीचे उच्चाटन करणे सुकर होऊन केंद्र शासनाने ठरवून दिलेली शाश्वत विकासाचे ध्येय गाठणे राज्यास सुकर होईल.

९. उपरोक्त सर्व बाबी लक्षात घेता दिनांक 24 सप्टेंबर, 2021 रोजी सामाजीक वनिकरण, वन विभाग, रेशीम उद्योग, कृषि विभाग व इतर यंत्रणा यांना बाहयस्थ संस्थेद्वारे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत च्या निर्णयानुसार व दिनांक १६ नोव्हेंबर,२०२१ शासन परिपत्रकांतील तरतुदीनुसार तालुका व जिल्हा स्तरावरील यंत्रणांना बाहयस्थ संस्थेद्वारे मनुष्यबळ उपलब्ध करणे व केंद्र शासनाच्या वर्ष 2013 मधील मार्गदर्शक सुचनानुसार 2500 सक्रिय जॉब कार्ड (Active Job card) धारकासाठी एक पालक तांत्रिक अधिकारी (तांत्रिक सहाय्यक ) बाहयस्थ संस्थेद्वारे उपलब्ध करुन घेण्याबाबतचे निर्देश लक्षात घेऊन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बाहयस्थ संस्थेमार्फत उपलब्ध करुन घेण्यात येणाऱ्या मनुष्यबळाची संख्या निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:**

मनरेगा योजनेअंतर्गत काम करणाऱ्या विविध यंत्रणांना पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून देवून अधिकाधिक स्थावर मालमत्ता निर्माण करता येईल व निर्माण झालेल्या अशा मालमत्तेमधून गरिबीचे उच्चाटन करणे सुकर होऊन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा २००५ चे उदीष्ट साध्य होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

२. मागील आर्थिक वर्षाच्या निर्मित मनुष्यदिवसांच्या आधारावर पंचायत समिती/ यंत्रणा स्तरावर बाहयस्थ संस्थेद्वारे उपलब्ध करून द्यावयाच्या पदांची संख्या (कार्यरत मनुष्यबळासह) खालील प्रमाणे अनुज्ञेय करण्यात येत आहे.

| **सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (APO), डाटा ऍन्ट्री ऑपरेटर (CDEO) आणि पालक तांत्रिक अधिकारी (PTO) (तांत्रिक सहाय्यक) ची अनुज्ञेय संख्या** | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Dist.** | **Allowed APO** | **TOTAL Allowed CDEO** | **Allowed PTO** |
| 1 | 2 | 3 | 6 | 9 |
| 1 | Ahmednagar | 28 | 54 | 59 |
| 2 | Akola | 14 | 27 | 34 |
| 3 | Amravati | 48 | 107 | 76 |
| 4 | Beed | 48 | 86 | 105 |
| 5 | BHANDARA | 29 | 62 | 75 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | Buldhana | 21 | 40 | 48 |
| 7 | Chhatrapati Sambhaji Nagar | 40 | 79 | 96 |
| 8 | Chnadrapur | 43 | 84 | 69 |
| 9 | Dharashiv | 21 | 44 | 31 |
| 10 | Dhule | 14 | 32 | 38 |
| 11 | Gadchiroli | 36 | 69 | 53 |
| 12 | Gondia | 38 | 85 | 95 |
| 13 | Hingoli | 23 | 49 | 37 |
| 14 | Jalgaon | 26 | 49 | 55 |
| 15 | Jalna | 33 | 75 | 65 |
| 16 | Kolhapur | 12 | 19 | 18 |
| 17 | Latur | 38 | 71 | 52 |
| 18 | Nagpur | 23 | 40 | 41 |
| 19 | Nanded | 41 | 82 | 71 |
| 20 | Nandurbar | 18 | 49 | 58 |
| 21 | NASHIK | 27 | 59 | 71 |
| 22 | PALGHAR | 27 | 68 | 50 |
| 23 | PARBHANI | 34 | 75 | 57 |
| 24 | Pune | 15 | 26 | 22 |
| 25 | Raigad | 15 | 24 | 11 |
| 26 | RATNAGIRI | 10 | 24 | 23 |
| 27 | Sangali | 12 | 22 | 19 |
| 28 | Satara | 15 | 23 | 26 |
| 29 | Sindhudurg | 8 | 20 | 15 |
| 30 | Solapur | 17 | 30 | 33 |
| 31 | Thane | 6 | 16 | 11 |
| 32 | WARDHA | 14 | 28 | 22 |
| 33 | WASHIM | 14 | 35 | 33 |
| 34 | YAVATMAL | 41 | 81 | 86 |
| **MAHARASHTRA** | | **849** | **1734** | **1656** |

३. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनाअंतर्गत काम करणाऱ्या क्षेत्रीय यंत्रणांना कार्यव्याप लक्षात घेवून शासनाने नियुक्त केलेल्या बाहयस्थ संस्थेद्वारे मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी यांनी करावी.

४. शासनाने नियुक्त केलेल्या बाहयस्थ संस्थेमार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या मनुष्यबळाचे संपुर्ण संनियत्रण जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे राहील. मनुष्यबळाबाबतचा कुठलाही प्रस्ताव जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी यांचे मार्फतच शासनास सादर करावा.

५. उपरोक्त प्रमाणे निश्चित केलेले सुधारित मनुष्यबळ जिल्ह्यातील निर्मित मनुष्य दिवस व सक्रिय जॉबकार्ड या आधारावर उपरोक्त प्रमाणे अनुज्ञेय करून देण्यात येत आहे. तसेच, एखादा तालुका, जिल्हा स्तरावर स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन अधिकचे मनुष्यबळ उपलब्ध करून देणे अथवा अनावश्यक मनुष्यबळ कमी करणे बाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

६. मनुष्यबळाच्या मानधनावरील खर्च केंद्र शासनकडून उपलब्ध होणारा 6% प्रशासकिय खर्च व 12 मे, 2010 रोजी मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार मनरेगा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अतिरिक्त 3 टक्के प्रशासकिय निधी मधून भागविण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक **२०२४०९२७१६५०२२२११६** असा असून सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

JANA J VALVI

Digitally signed by JANA J VALVI
Date: 2024.09.27 19:38:53 +05'30'

**(ज. जि. वळवी)**
**उप सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१ . मा. मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव.

२. प्रधान सचिव (रोहयो), यांचे स्वीय सहायक.

३. सर्व विभागीय आयुक्त

४. आयुक्त, कृषी आयुक्तालय, पुणे.

५. आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर

६. सर्व जिल्हाधिकारी

७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

८ सर्व उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालये.

९. संचालक (फलोत्पादन), कृषी आयुक्तालय, पुणे.

१०. संचालक (मृद संधारण), कृषी आयुक्तालय, पुणे.

११. मुख्य अभियंता (मृद व जलसंधारण) सर्व.

१२. सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी

१३. सर्व जिल्हा रेशीम अधिकारी.

१४. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)

१५. सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा, ग्रामपंचायत)

१६. सर्व गटविकास अधिकारी, नरेगा

१७. उपवनसंरक्षक (सर्व)

१८. उपसंचालक, सामाजिक वनीकरण (सर्व)

१९. वित्त विभाग (अर्थ-१६, व्यय-८)

२०. नियोजन विभाग (का. १४३४व का.१४२४)

२१. निवड नस्ती, रोहयो - ७.